# *देव स्वयं त्याच्या वचनाचा अनुवादक आहे*

आमच्या स्वर्गीय पित्या, तुझे वचन, सर्व मनुष्यांच्या काही करणे किंवा बोलणे ह्यापेक्षा अधिक आहे, कारण लोक तुला भेटण्याकरीता वाट पाहात आहेत. आणि आम्ही तुझे आभार मानतो कारण तेथे असे आहेत जे अपेक्षेने आले आहेत, ते काही तरी घडण्याची वाट पाहत आहे, आणि जेव्हा लोक कशासाठी तरी तहानलेले आहे, लोढा लोढ्याला बोलावितो, तेथे त्या बोलावण्याला प्रतिसाद देण्यासाठी खोली असली पाहीजे. त्याचमुळे आम्ही येथे ह्या रात्री आलो आहोत, कारण ते तू ह्या सेवकांच्या, व लोकांच्या हृदयात तू घातलेस की आम्हीला एकत्र बोलवावे की तुझ्याकडे तुझा अनुग्रह व आशीर्वाद मागावा, विश्वास ठेवून की तू आजाऱ्यांना आरोग्य देशील आणि हरविलेल्यांना वाचवशील, आणि तुझे वचन प्रकट करशील.

2 आणि आम्ही प्रार्थना करितो, हे स्वर्गीय पित्या की हे तू आम्हाला देशील कारण आम्ही नम्रतेने अनेक रात्रींपासून तुजकडे मागत आहोत. येथे अशा—अशाप्रकारे तुझ्या पवित्र आत्म्याचा वर्षाव होवो, आणि प्रत्येक व्यक्तीने देवा तुझ्याशिवाय इतर आजूबाजूंचा कोणत्याही गोष्टींकडे न पाहो. तेथे मोठ्या आक्रोशाने देवा तुझ्यासाठी तहानलेले होवोत, येथे पूर्ण देशभर संजीवन येवो आणि प्रत्येक मंडळी लोकांनी तुडुंब भरली जावो, पापी आक्रोश करुन दयेसाठी देवा तुजकडे येवोत, आणि—आणि पवित्र आत्मा आजाऱ्यांना बरे करो, लंगड्यांना चालते करो, आणि मेलेल्यांना उठवो, आणि अशा सर्व गोष्टी देवो ज्या तुझ्या वचनात देण्याचे अभिवचन दिले आहे.

3 प्रभू येशू तू ये, आणि तू वचन पूर्ण कर. ह्या रात्री आमच्याकडे ये. आम्ही विश्वास करतो की तू काल, आज आणि युगानूयुग सारखा आहे, तुझी वचने कधीच पडू शकत नाही. आकाश आणि पृथ्वी नाहीतशी होतील परंतु तुझी वचने नाहीतशी होणार नाहीत. आमची समज खोल. तुझा पवित्र आत्मा येवो आणि ह्या पडित जमिनीवर पडो. ह्या रात्री आमची समज देवाचा आत्मा आणि सामर्थ्यासाठी खोल, ह्यासाठी तो त्याची वचने आम्हाला प्रकट करील. आम्ही ते प्रभू येशूच्या नावाने मागतो म्हणून ऐक. आमेन.

4 आता, ह्या रात्री, तुम्ही जे वचन पाहात आहात, आपण पवित्र शास्त्रातील पेत्राचे दूसरे पत्र काढूया. आणि 15 व्या वचनापासून सुरुवात करुया, काही क्षण वचनांतून बोलण्यासाठी,

> *आणि माझे निर्गमन झाल्यावरही त्या गोष्टींची आठवण सर्वदा तुम्हांस करिता यावी म्हणून मी शक्य तितके करीन.*
>
> *कारण चातुर्याने कल्पिलेल्या कथांस अनुसरुन आम्ही आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताचे सामर्थ्य व आगमन ह्यासंबंधाने तुम्हांस कळविले असे नाही.* तर *आम्ही त्याचे ऐश्वर्य प्रत्यक्ष पाहणार होतो.*

5 मला ते आवडते, "प्रत्यक्ष पाहणारे." दंतकथा नाही. आपण ज्या गोष्टींविषयी बोलत आहोत त्याचे आपण साक्षीदार आहोत.

*कारण त्याला देवपित्यापासून सन्मान व गौरव मिळाले. तेव्हा ऐश्वर्ययुक्त गौरवाच्याद्वारे अशी वाणी झाली की, हा माझा परमप्रिय पुत्र आहे, ह्याच्याविषयी मी संतुष्ट आहे.*

*त्याच्याबरोबर पवित्र डोंगरावर असताना आकाशातून आलेली ही वाणी आम्ही स्वत: ऐकली.*

*शिवाय अधिक निश्चित असे संदेष्ट्याचे वचन आम्हांजवळ आहे; ते काळोख्या जागी प्रकाशणाऱ्या दिव्याप्रमाणे आहे, तुमच्या अंतःकरणात दिवस उजाडेपर्यंत, व पहाटेचा तारा उगवेपर्यंत तुम्ही त्याकडे लक्ष द्याल तर बरे होईल.*

*प्रथम हे ध्यानात ठेवा की, शास्त्रातील कोणत्याही संदेशाचा उलगडा कोणाला स्वतःच्या कल्पनेने होत नाही.*

*कारण संदेश मनुष्याच्या इच्छेने कधीच आलेला नाही. तर पवित्र आत्म्याने प्रेरित झालेल्या मनुष्यांनी देवापासून आलेला संदेश सांगितला आहे.*

6 प्रभू त्याच्या वाचलेल्या वचनावर आशीर्वाद देवो. आता, मी हे वचन ह्या विषयावर बोलण्यासाठी घेत आहे: *देव स्वयं त्याच्या वचनाचा अनुवादक आहे.*

7 आपण गोंधळाच्या दिवसात राहत आहोत. आपण अशा दिवसात राहत आहोत जेव्हा पुरुष आणि स्त्रीयांना काय करावे हे त्यांना क्वचितच कळते. प्रत्येक गोष्टीत, ते—ते गोंधळात आहे असे वाटते. प्रत्येक गोष्ट, असे वाटते की तेथे एका गोष्टीकडे पाहण्याचे निरनिराळे मार्ग आहेत. ते सैतान करीत आहे.

8 आता, देव लोकांचा न्याय प्रामाणिकपणे, खरेपणाने करु शकत नाही, जोपर्यंत तेथे काही मानक आहे ज्याद्वारे तो त्यांचा न्याय करील. आणि पवित्र शास्त्र सांगते की देव येशू ख्रिस्ताद्वारे सर्व मनुष्यांचा न्याय करणार आहे, आणि येशू ख्रिस्त वचन आहे. संत योहान, पहिला अध्याय, ते सांगते:

*प्रारंभी शब्द होता, शब्द देवासह होता आणि शब्द देव होता*

*आणि शब्द देही झाला आणि त्याने आम्हामध्ये वस्ती केली…*

9 आज आपण सर्व त्याचे गुणधर्म प्रगट करीत आहोत. देवामध्ये…प्रारंभी तो देव नव्हता, देव, त्याला आपण "अनादी" संबोधतो. तो देव नव्हता, कारण *देव* ह्या शब्दाचा *God* (इंग्लिश वर्ड), इंग्रजी शब्द अर्थ "भजनीय" आणि तेथे त्याची उपासना करण्यासाठी काही नव्हते. म्हणूनच तो अनंतकालिक असा होता, सर्व ज्ञानांचा मुख्य स्त्रोत आणि ह्या सर्व ज्ञानांच्या स्त्रोतात तेथे —अणू, परमाणू किंवा काहीच नव्हते. कोठेही प्रकाश, तारे, चंद्र, दूसरे काही नव्हते. देव, देव म्हणून आपण काय ओळखतो, एक महान आत्मा जो अनादि होता. (ज्याला सुरुवात नाही, शेवट नाही.) तो तेथे होता. आणि त्याच्यामध्ये गुणधर्म होते; देव होण्यासारखे गुणधर्म त्यात होते, नंतर त्याचे गुणधर्म पित्यासारखे, गुणधर्म पुत्र म्हणून, गुणधर्म एक तारणारा म्हणून, गुणधर्म एक आरोग्यदाता म्हणून. सगळे गुणधर्म त्याच्यात होते. आणि तो…त्या गोष्टी ज्या उलगडल्या होत्या, त्या फक्त त्याचे गुणधर्म जे प्रकट होणार होते त्या आहेत.

10 मला काय सांगायचे आहे, *गुणधर्म* हे त्याचे "विचार," होते. आणि *शब्द* म्हणजे "विचार प्रकट करणे आहे." आणि तेव्हा ते त्याच्या विचारात होते. आणि जेव्हा तो बोलला, "असे होवे," आणि तसे झाले. "असो होवो," आणि तसे झाले.

11 आणि. आता, लक्षात घ्या, तुम्ही ख्रिस्ती जगाच्या स्थापनेअगोदर त्याच्या विचारांत होते. आणि तुम्ही त्याच्या विचारांचे प्रकटीकरण आहात. जगाच्या स्थापनेअगोदर, तुम्ही ख्रिस्तामध्ये होतात, (आमेन) प्रारंभी देवामध्ये. पाहिलत ते तुम्हाला, त्याचे प्रजाजन बनविते. आणि त्या सर्वात देव स्वतःला हाताळण्याजोगा, स्पर्शनीय व दृश्य भौतिक असा—असा प्रकट करतो. आणि तसाच देव आहे, संपूर्ण गोष्ट अशी आहे.

12 मग लोक म्हणतात, "तो अनुवाद..." फार काळ झाला नाही, मी एका सभेत बोलत होतो, एक मनुष्य मला बोलला, तो म्हणाला, "भाऊ ब्रॅन्हम, तुमचा अनुवाद चुकीचा आहे. तुम्ही तो अनुवाद बरोबर केला नाही."

13 आता, आपण ऐकतो...ते मेथॅडीस्टकडे जातात, आणि ते म्हणतात, "बाप्टिस्ट अनुवाद बरोबर करीत नाही." बाप्टिस्ट म्हणतात, "पेंटेकॉस्टल्स करीत नाही." पेंटेकॉस्टल म्हणतात की, "वननेस करीत नाही." वननेस म्हणतात, "अंसेम्ब्लीज करीत नाहीत." आणि प्रत्येकजण म्हणतो दूसरा करीत नाही.

14 देव स्वयं त्याचा अनुवादक आहे! त्याच्यासाठी अनुवाद करण्यासाठी त्याला कोणाची गरज नाही. तो स्वयं त्याचा अनुवाद करतो. असा कोण मनुष्य आहे जो देवाचा अनुवाद करु शकतो? देव स्वत: त्याचा अनुवादक आहे.

15 आता, पेत्र येथे सांगत आहे, आपल्याला कळते की प्रारंभी जेव्हा देव बोलला, "प्रकाश होवो," आणि प्रकाश झाला तोच त्याचा अनुवाद आहे. जेव्हा देव काही बोलला आणि तसे घडून आले, तोच देवाचा अनुवाद आहे. की त्याचे वचन सत्य आहे. पाहा? जेव्हा तो बोलला, "प्रकाश होवो," तेथे प्रकाश अस्तित्वात येण्याअगोदर ते त्याच्या विचारात होते. जेव्हा तो बोलला, "प्रकाश होवो," आकाशात प्रकाश पडला, तोच अनुवाद आहे. त्याचा अनुवाद कोणालाच करण्याची गरज नाही; कारण देव तसे बोलला आणि तसे झाले. जेव्हा देव बोलतो आणि ते घडून येते. तोच त्यांच्या वचनाचा अनुवाद आहे. मनुष्य हे का समजू शकत नाही? लोक ते का समजत नाही?

16 जेव्हा देव वचन देतो आणि देव म्हणतो...उत्पत्तीस, प्रारंभी, त्याने त्याचे वचन प्रत्येक युगासाठी दिले, जसे ते सुरुवातीपासून शेवटपर्यंत तसेच आले. आणि ह्या सर्व युगांतून, मंडळीच्या जगतामध्ये ह्या सर्व गोष्टी आल्या, सर्व मिश्र परंपरा, आणि असेच, आणि देवाने सदैव जुन्या व नविन करारात, त्याचे संदेष्टे पाठविले! आणि देवाचा शब्द संदेष्ट्याकडे येतो. आणि तो कसे करतो? ते देवाचे वचन प्रकट करते. देवाचे प्रकटीकरण, ते सांगते की ते बरोबर आहे अथवा चुकीचे. त्याचा अनुवाद कोणालाही करण्याची गरज नाही, वचन स्वत: अनुवाद करते. देवाने हे वचन दिले आणि तेथे तसे घडतेच!

17 असे म्हणणे चांगले आहे का की ते दूसरे काहीतरी सांगत आहे? असा पापी मनुष्य कोण आहे जो असे म्हणण्याचा प्रयत्न करील (जेव्हा देव एखादे वचन देतो आणि देव ते पूर्ण करतो) की त्याचा अनुवाद चुकीचा आहे? देव स्वयं त्याच्या वचनाचा अनुवाद करतो, अनुवाद करीत आहे. त्याला त्याचा अनुवाद करण्यासाठी कोणाचीही गरज नाही; तो स्वतःच अनुवाद करतो, त्याचे वचन जे तो पूर्ण करणार आहे ते प्रकट करण्याद्वारे करतो.

18 ओह, जर मंडळी ते समजू शकेल आणि त्याची वचने पाहील जी त्याने प्रत्येक युगात दिली आहेत! बाकी सर्व युगात, देवाने पृथ्वीवर पाठीविले (सातही मंडळी युगांतून) आणि त्याने करण्याचे वचन दिल्याप्रमाणे सर्व प्रकट केले आहे. सर्वकाही, अशी एकही गोष्ट नाही जी त्याने अपूर्ण ठेवली. तंतोतंत! त्याने जे सांगितले की तो करील, ते त्याने केले.

19 कारण जेव्हा देव बोलला, यशयामध्ये, तो म्हणाला, "कुमारी गर्भवती होईल," आणि ती झाली. आता, कोण—कोण त्याचा अनुवाद करील? देवाने त्याचा अनुवाद

केला. तो म्हणाला, “कुमारी गर्भवती होईल,” आणि ती गर्भवती झाली. आता, त्याविषयी काहीही बोलू शकत नाही, कारण देव म्हणाला ती होईल आणि ती झाली. परंतु, मंडळी हे पाहण्यासाठी आंधळी झाली. त्यांच्याकडे स्वतःच्या कल्पना होत्या. ते त्यांच्यासाठी त्यांच्या अपेक्षेपेक्षा—पेक्षा वेगळे होते.

20 पेत्र येथे मागचा संदर्भ देतो, तो म्हणतो, “देवाने त्याच्या वचनाद्वारे ख्रिस्ताला प्रकट केले, तो म्हणाला, ‘हा माझा परमप्रिय पुत्र आहे.’” हे विश्वासी तेथे उभे होते. आणि ख्रिस्त देवाचे प्रकटीकरण होता. त्याने सदैव ख्रिस्ताला त्याच्या वचनाद्वारे प्रकट केले, ख्रिस्तच वचन आहे. तो सदैव प्रकट करतो.

21 जेव्हा तो बोलला...नोहाच्या दिवसात, ख्रिस्त नोहामध्ये होता. तुम्ही हे विश्वास करता काय? नोहा म्हणाला, “पाऊस पडणार नाही. तेथे पाऊस पाडणार आणि मी केलेले सर्व काही भूतलावरुन नाहीसे करणार.” पाऊस पडला. त्यासाठी अनुवादाची गरज नव्हती. पाऊस पडला कारण देव, जो नोहामध्ये होता, बोलला, “पाऊस पडणार आहे,” तो एक संदेष्टा होता, आणि त्याचा पुरावा हा होता की तो जे बोले, ते घडत असे. म्हणून त्यांना ते अनुवाद करण्याची गरज नव्हती.

22 तेथे त्यांच्यातील काहीजण असेही बोलले असतील, “हा काय बोलत आहे ते ह्या मनुष्याला कळत नाही.”

23 परंतु देवाने नेहमीच वचन दिले आहे, “जर तुमच्यात कोणी आत्मिक, किंवा संदेष्टा असेल, आणि तो जे काही बोलतो ते घडते, तर त्याचे ऐका.” हे बरोबर आहे, कारण ते सत्य आहे, ते वचनाप्रमाणे असले पाहिजे. आणि नोहा वचनाप्रमाणे चालत होता. जेव्हा त्याने संदेश दिला की पाऊस पडणार आहे, आणि पाऊस पडला, तेथे कोणत्याही अनुवादाची गरज नाही, कारण तेथे तसेच घडले.

24 यशया म्हणाला, “कुमारी गर्भवती होईल.” आणि ती झाली. आता, ते भयानक व असामान्य होते. कारण, पाहा, कुमारी गर्भवती होण्याच्या शेकडो वर्षे आधी ती केली होती.

25 ते इतके असामान्य होते की योसेफ नावाचा भला मनुष्य, तिचा पती, “तो नीतीमान होता व तिची बेअब्रू करण्याची त्याची इच्छा नव्हती...” तो नीतिमान मनुष्य त्या दिवसात, त्या योसेफाची काय अवस्था असेल जेव्हा त्याचे मरीयेशी सोयरिक झाली होती.

26 तिचे सोयरिक झाले होते. त्या दिवसात, ते तोडणे म्हणजे व्यभिचार करण्यासारखे होते. आणि, आणि, अर्थात, योसेफासाठी, ते असे होते. आणि तिच्या बचावासाठी त्याचा उपयोग करीत होती, किंवा त्याला तिची चुक दाखवण्यासाठी वापरत होती. कारण ती आई होणार हे तीला कळले होते, ती विवाहीत नव्हती, फक्त वाग्दत्त झाले होते. अशी कल्पना म्हणजे नियमशास्त्राप्रमाणे ते मरेपर्यंत धोंडमार करण्यासारखे कृत्य होते.

27 आणि योसेफ, तिचा पती, एक नीतीमान मनुष्य होता, खूप नीतिमान होता. तो देवावर विश्वास ठेवीत होता. आणि जेव्हा तिने त्याच्याकडे त्या प्रेमळ, मोठ्या सौम्य नजरेने पाहिले, आणि म्हटले, “योसेफ, गब्रीएल आद्य देवदूत मजकडे आला आणि मला म्हणाला की मी गर्भवती होणार आहे, पुरुष ठाऊक नसताही.”

28 आता, जर योसेफाने मागे शास्त्रात पाहीले असते, संदेष्ट्याने म्हटले होते ती ते करील! देवच फक्त त्याच्या वचनाचा स्वयं अनुवादक आहे! पाहा? परंतु ती फारच असामान्य गोष्ट होती.

29 तीच परिस्थिती कोणत्याही युगात असती. देवाचे वचन लोकांसाठी अपरिचीत आहे. ते खूप असामान्य आहे. देव नेहमीच असामान्य गोष्टी करतो. देव कोठेही असामान्यच आहे.

ते जगाच्या पद्धतीविरुध्द आहे, कारण ते अशा गोष्टी करतात ज्या त्यांच्या विचारांप्रमाणे असतात परंतु देव येतो आणि असामान्य गोष्टी करतो.

30 "ही कुमारी कशी गर्भवती होऊ शकते?" तो प्रमाणिक होता, त्याने त्यासंबधी देवाकडे विचारणा केली.

31 आणि मग देव त्याच्याबरोबर स्वप्नांतून बोलला, आणि म्हणाला, "योसेफा, दावीदाच्या पुत्रा, तू मरीयेचा आपली पत्नी म्हणून स्वीकार करण्यास अनमान करु नकोस, तिच्या पोटी जो गर्भ आहे तो पवित्र आत्म्यापासून आहे. देवाने तिच्यावर छाया केली. हेच तेथे झाले."

32 तुम्ही पाहिलेत का की देवाने तेथे योसेफाशी कसा व्यवहार केला? दुसऱ्या. मार्गाने, स्वप्नाद्वारे. आता आम्हाला ठाऊक आहे की तेथे स्वप्न असतात, आम्ही स्वप्नांवर विश्वास ठेवतो. मी स्वप्नांवर विश्वास ठेवतो...देव नेहमीच लोकांशी स्वप्नांतून बोलतो. परंतु स्वप्न दुय्यम मार्ग आहे, पाहा ते खरे किंवा खोटे असू शकते जोपर्यंत त्याचा अनुवाद होत नाही. परंतु देवाला कोणत्याही अनुवादाची गरज नाही. तो देव स्वतः होता जो थेट योसेफाशी बोलत होता, कारण त्या दिवसात देवास अनुवाद करण्यासाठी कोणी संदेष्टा नव्हता. तेथे चारशे वर्षे कोणी संदेष्टा नव्हता. म्हणून सर्वात चांगला, देवाने त्याच्या स्वतःच्या पुत्राच्या कल्याणाची काळजी केली, योसेफाशी स्वप्नाद्वारे बोलला, आणि अनुवादाशिवाय तो म्हणाला, "ती स्त्री खरी आहे. तिच्या पोटी जो गर्भ आहे. तो देवाचा पुत्र आहे." कोणत्याही अनुवादाची गरज नाही,

33 देव स्वयं त्याचा अनुवाद करतो, जे पुरुष आणि स्त्री प्रामाणिक, खऱ्या अंतःकरणाने ज्या गोष्टी अद्भूत आहेत त्याकडे पाहतात, जर तुम्ही प्रामाणिक व खरे आहात आणि विश्वास ठेवाल, देवाकडे तुम्हाला त्याचा अनुवाद करण्याचा मार्ग आहे. प्रथम, शोधा की ते अभिवचन आहे का. जर योसेफ फक्त मागे गेला असता आणि परंपरेपासून दूर गेला असता, आणि पवित्रशास्त्राकडे वळला असता, आणि त्याने शोधले असते, यशयाने सांगितले होते की ती ते करणार आहे.

34 आणि त्या गोष्टी ज्या बोलल्या होत्या, आणि त्याचा जन्म, आणि, त्याविषयी शास्त्रात, "पवित्र संदेष्टयांद्वारे सांगितले होते," जसे पेत्राने सांगितले. आणि कोणत्याही मनुष्यास त्याचा स्वतःचे अनुवाद करण्याचा अधिकार नाही. ते तंतोतंत घडले जे देवाने घडेल असे सांगितले होते. तो त्या दिवसासाठी देवाच्या वचनाचे प्रकटीकरण होता. देव ते बोलला, म्हणून ते घडले. तेच अंतिम झाले.

35 येशू म्हणाला...जेव्हा तो जगात होता, जेव्हा ते त्याची सेवकाई ओळखू शकले नाही, ते खूप महान, मोठे अभूतपूर्व होते. (ते ओळखू शकले नाहीत.) तर आश्चर्यकारक होते. ते त्याला ओळखू शकले नाहीत. तो म्हणाला, "शास्त्रलेख शोधा!" (मला आशा आहे की मी तुमची कानठळी बसवत नाहीए आवाजाद्वारे) "तुम्ही शास्त्रलेख शोधून पाहता, कारण त्याच्याद्वारे तुम्हाला सार्वकालिक जीवन प्राप्त होईल असे तुम्हाला वाटते आणि तेच माझ्याविषयी साक्ष देणारे आहे." पाहा? "तेच मी कोण आहे ते तुम्हाला सांगते."

36 पाहा, देवाने शब्द बोलला. तोच दिवस देवाच्या प्रकटीकरणाचा होता, देव (इम्मान्युएल) आमच्या सन्निध, "त्याला अद्भूत मंत्री, शांतीचा अधिपती, समर्थ देव, सनातन पिता म्हणतील. आणि त्याला *इम्मानुएल* म्हणतील, 'आमच्यासन्निध देव.'" देव दाविदामध्ये होता. देव मोशेमध्ये होता. तो देवच त्याला त्या त्या युगात त्यांच्याद्वारे प्रकट करीत होता. पण ह्या युगात, "कुमारी गर्भवती होईल आणि पुत्र प्रसवेल, आणि तो देव आम्हा सन्निध असेल."

37 म्हणूनच त्याने त्याला वधस्तंभाद्ववर खिळले, स्वत:ला देव म्हटल्यामुळे, आणि शब्बाथही मोडल्यामुळे, तो—तो शब्बाथाचा प्रभू होता आणि तो देव होता. आणि तो फक्त सामान्य मनुष्य किंवा सामान्य संदेष्टा नव्हता. (तरी तो एक सामान्य मनुष्य आणि एक संदेष्टा होता.) परंतु तो देव-संदेष्टा होता. आणि तो वचनाची पूर्णता होता, देवाने जे सांगितले की तो करील, ते केले. म्हणाला, “तुमच्यामधील कोण मला पापाचा दोष लावू शकतो? शास्त्रलेख शोधता! त्याच्याद्वारे तुम्हाला सार्वकालिक जीवन प्राप्त होईल असे तुम्हाला वाटते, आणि तेच माझ्याविषयी साक्ष दणारे आहे.” परंतु त्याच्या परंपरा, ते दुसऱ्या झगझगीत प्रकाशाच्या काळात राहत होते.

38 मी काही आठवड्यामागे प्रचार करीत होतो. विषयाचे नाव “*डोळे दिपवून टाकणाऱ्या झगमगीत प्रकाशात राहणे.*” तो झगमगीत प्रकाश म्हणजे, “मृगजळ” आहे, जो सूर्य परावर्तित करतो आणि तो खोटा असतो. आणि कोणत्याही दुसऱ्या, युगाचा हा झगमगीत प्रकाश हे खोटे प्रतिबिंब असते. लोक नेहमीच अशा काही गोष्टीत चालत असतात ज्या वर्षांअगोदर घडलेल्या असतात. जे लूथरन्स आहेत. ते लूथरनच्या प्रकाशात चालतात. लूथरनचा सूर्य प्रकाश त्याच्या दिवसात चांगला होता. वेस्ली त्याच्या दिवसात चांगला होता; पेंटेकॉस्टल त्यांच्या दिवसात चांगला होता. आपण शिडीवर चढत आहोत. आपण दुसऱ्या युगात राहत आहोत. आपण पुढे-पुढे जात आहोत, आपण मागे बघत राहू शकत नाही.

39 जेव्हा आपण स्वत:ला काही गोष्टीस स्थिर करतो, आपल्याला वाटते आपण ते सर्व केले, आपण आपल्या परंपरा गुंडाळून ठेवतो; आणि ते त्या दिवसासाठी योग्य होते, पण आपण पुढे जात आहोत! तुम्ही शास्त्रलेख शोधा आणि बघा आज आपल्यासाठी काय वचन दिले आहे, तरच आपल्याला कळेल की आपण कोठे आहोत, तरच आपण सांगू शकतो आपण कोठे उभे आहोत.

40 लूथर; तुम्ही वचनात बघू शकला आणि त्या—त्या सार्दिस युगात पाहा, तुम्हाला नक्कीच समजले असते तुम्हाला कुठले असे वचन दिले आहे. पाहा, कुठल्या प्रकारचा घोडेस्वार पुढे गेला, पाहा नक्की त्याला भेटण्यासाठी कोण गेला, “मनुष्याचा धूर्तपणा,” सुधारणुकीचा काळ. वेस्लीला पाहा, आणि असेच पुढे-पुढे जसे पेंटेकॉस्टचे युग आले, आणि त्या युगात पुढे जात गेले पाहा ते कसे पुढे गेले: वचनात शोधा आणि पाहा. आपण आता कोठे आहोत. म्हणूनच येशू म्हणतो, “शास्त्रलेख शोधा!”

41 पाहा, आपण आता कोठे आहोत! मी विश्वास करतो की आपण आता देवाच्या पुत्राच्या येण्याच्या वेळेत आहोत. मी विश्वास करतो की आपण आता त्या युगाच्या वेळेत आहोत की जेव्हा तो कोणत्याही वेळेस प्रकट होईल. मी विश्वास करतो हे वचन प्रकट करीत आहे, की आपण ह्या जगाच्या इतिहासातील अगदी शेवटच्या तासात आहोत. मी पाहू शकतो अशा गोष्टी ज्या वळण घेत आहेत. पाहा ही इक्युमिनीकल परिषद जी सर्व मंडळ्यां त्यात नेत आहे, पशूच्या छापेमध्ये. आणि हे रोमन साम्राज्य आणि ते काय करीत आहे, आणि त्यांच्यातील इतर सर्व. पाहा ते एकत्र होत आहेत, प्रकाशाला अडवित आहेत, सुवार्ता बंद करीत आहे. सर्वांना त्यांचे व्हावे लागेल आणि त्यांच्या प्रकाशात चालावे लागेल किंवा नाहीतर तुम्ही मुळीच चालू शकणार नाही. पाहा, आपण अंतिम समयात आलो आहोत. तेथे आपल्यासाठी काहीच राहिलेले नाही, परंतु देवाला पकडून राहणे आणि त्याच्या वचनावर विश्वास ठेवणे. वचन हे सदैव सत्य आहे.

42 लावदिकीया मंडळी युगाच्या, सर्व युगात हेच फक्त मंडळीचे युग असे आहे, ज्यात ख्रिस्ताला मंडळीच्या बाहेर काढले आहे. तो बाहेर दार ठोठावित आहे. काय झाले आहे?

ह्या इक्युमिनीकल परिषदेने त्याला बाहेर काढले आहे. पवित्र शास्त्र सांगते तो बाहेर असायला हवा होता, आणि तो आहे. ते काय बंद करते? वचन. आणि तो वचन आहे, तो सदैव वचन आहे, आणि तो आजही ह्या रात्री वचन आहे! तो वचन आहे.

43 पवित्र शास्त्र सांगते, "देवाचे वचन सजीव सक्रीय, कोणत्याही दुधारी तरवारीपेक्षा तीक्ष्ण असून, जीव व आत्मा, सांधे व मज्जा, ह्यांना भेदून आरपार जाणारे आणि मनातील विचार व हेतू ह्यांचे परिक्षक असे आहे." इब्री, 4था अध्याय. तो वचन होता! जेव्हा येशू त्या दिवसात हे बोलला, तेव्हा येशू कोण आहे हे त्यांनी ओळखायला पाहीजे होते.

44 पाहा त्याने काय केले. त्याच्या सेवकाईच्या सुरुवातीस, एके दिवशी तो तेथे उभा होता. तेथे शिमोन पेत्र नावाचा, व्यक्ती त्याच्याकडे आला. आणि जेव्हा पेत्राने त्याच्याकडे पाहिले आणि—आणि त्याला पाहिले येशू त्याला म्हणाला, "तू शिमोन आहेस आणि तू योनाचा मुलगा आहेस;" (त्याला माहीत असेल की मोशेने म्हटले आहे, "प्रभू, देव तुम्हासाठी माझ्यासारखा संदेष्टा तुमच्या बांधवांमधून उभा करील, तो जे काही तुम्हाला सांगेल त्याप्रमाणे सर्व गोष्टीत त्याचे ऐका.") आणि ह्या मनुष्याला त्याने त्याच्या आयुष्यात कधीही पाहीले नव्हते, म्हणाला, "तू शिमोन आहेस आणि तू योनाचा मुलगा आहेस." का, त्याला तेव्हाच कळले की ते तसे राहिले नाही...तेथे त्यांच्याकडे कित्येक वर्षांपासून कोणी संदेष्टा नव्हता, आणि येथे एक मनुष्य होता जो तो कोण आहे हे सांगत होता. म्हणूनच, त्याला ते कळू शकले, ह्यात आश्चर्य नाही!

45 फिलीप, त्यावेळेस, गेला आणि—आणि त्या झाडाखाली नथनेल भेटला, आणि त्यास त्याने येशूकडे आणले, येशूने म्हटले, "तू खराखुरा इस्त्राएली आहे तुझ्याठायी कपट नाही."

तो म्हणाला, "गुरुजी आपणाला माझी ओळख कुठली?"

46 तो म्हणाला, "फिलिपाने तुला बोलावण्याआधी जेव्हा तू त्या झाडाखाली होतास, तेव्हा मी तुला पाहीले."

47 तो म्हणाला, "रब्बी आपण देवाचे पुत्र आहात! आपण इस्त्राएलाचे राजे आहात!" त्याला ते ठाऊक होते! काय? त्याला कोणत्याही अनुवादाची गरज नाही, यहोवा असे म्हणतो!

48 तेथे असे उभे होते जे त्याच्यावर विश्वास ठेवत नव्हते. ते म्हणाले, "तो मनुष्य बालजबूल आहे. त्याच्याकडे—त्याच्याकडे काहीतरी युक्ती आहे ती तो खेचत आहे. तो—तो भविष्यवक्ता आहे, किंवा असेच काही."

49 येशूने त्यांच्याकडे पाहीले, आणि म्हणाला, "जर तुम्ही काही मनुष्याच्या पुत्राविरुध्द बोलला तर, त्याची त्याला क्षमा होईल. परंतु जेव्हा पवित्र आत्मा येईल, तेच कार्य करण्यासाठी व त्या आत्म्याविरुध्द बोलेल, तर त्याची त्याला कधीही क्षमा होणार नाही, ह्या युगी नाही किंवा येणाऱ्या युगीही नाही." तो आपल्या दिवसाविषयी भविष्यवाणी करीत होता. तो दिवस जो आपण पाहू शकतो. कारण तो काल, आज आणि युगानुयुगसारखा आहे.

लक्षात घ्या, तो प्रभू येशू ख्रिस्तच मोशेमध्ये होता.

50 दाविदात येशू ख्रिस्त होता, जेव्हा दाविद...दाविद पर्वतावर चढून गेला, नाकारलेला राजा, आणि यरुशलेमेसाठी रडला, ते दूसरे काही नसून ख्रिस्तच त्याच्यामध्ये होता. जवळजवळ आठशे वर्षांनंतर, दाविदाचा पुत्र जैतून डोंगरावर बसला आणि यरुशलेमेकडे पाहीले, आणि रडला आणि म्हणाला, "यरुशलेमे, यरुशलेमे, जशी कोंबडी आपली पिले

पंखाखाली एकवटते, तसे तुझ्या मुलाबाळांना एकवटायची कितीदा तरी माझी इच्छा होती, पण तुमची इच्छा नव्हती!"

51 जेव्हा योसेफ कैदेत होता, त्यात येशू होता. जेव्हा तो केवळ तीस चांदीच्या नाण्याकरिता विकला गेला होता, तो येशूच होता. जेव्हा त्याला पोटीफराच्या घरचा कारभारी नेमण्यात आले, तो येशू होता. जेव्हा तो फारोच्या उजव्या हातावर बसला. आणि जेव्हा तो जात असे, त्याच्यापुढे तुतारी वाजवित असत, आणि सगळेजण त्याच्यापुढे गुडघे टेकीत असत, ते येशूला दर्शवित होते; कोणताही मनुष्य फारोकडे योसेफाशिवाय—शिवाय येऊ शकत नव्हता. कोणीही मनुष्य येशूशिवाय देवाकडे येऊ शकत नाही, फक्त येशूद्वारेच. तो येशू होता, ज्याबद्दल भविष्यवाणी केली होती तो शब्द पूर्ण झाला होता, जे बोलले गेले छाया व वास्तवाच्या रुपात.

52 जेव्हा येशू येथे पृथ्वीवर होता, त्याने त्याच गोष्टी केल्या ज्या संदेष्ट्यांनी केल्या, त्यामुळेच त्यांना कळले की तो देवाच्या वचनाचे प्रकटीकरण आहे. त्याचा अनुवाद करण्याची गरज नव्हती.

53 जेव्हा नथनेलाने हे पाहीले, तो खाली उतरला, म्हणाला, "आपण इस्त्राएलाचे राजे आहात, देवाचे पुत्र आहात, इस्त्राएलाचे राजे. आम्ही तुला ओळखतो, कोणी मनुष्य हे करु शकत नाही."

54 निकदेम रात्री आला, त्याच गोष्टी परुशांकरिता बोलला. परंतु, तुम्हाला माहीत आहे, ते अशाप्रकारे त्यांच्या इक्युमिनीकल परिषदेत अडकले होते की ते हे स्विकारु शकले नाही. त्याने प्रगट केले जे त्यांनी म्हटलेले, म्हणाले, "गुरुजी, आम्ही..." "आम्ही" कोण आहोत? त्यांची परिषद! "आम्हाला ठाऊक आहे की आपण देवापासून आलेले शिक्षक आहा. कारण ही जी चिन्हे आपण करिता ती देव बरोबर असल्यावाचून कोणालाच करता येत नाही." त्यांनी ते ओळखले, ते हे त्यांना ते कळत होते, परंतु ते त्यात खूप अडकले होते.

55 आणि देव, गेल्या चाळीस वर्षांत, ह्या राष्ट्रांना पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्याने हादरवित आहे, आणि पुरुष आणि स्त्रिया अजुनपर्यंत त्याच्या बाहेर आहेत कारण ते त्याच गोष्टींत अडकले आहेत, दुसऱ्या दिवसाच्या झगमगीत प्रकाशात राहत आहेत. हे काय आहे? प्रत्येक जण मेथॉडीस्ट, बाप्टिस्ट, प्रेसबेटेरियन, लुथरन, किंवा असेच काही बनू इच्छितो. पाहा, हा झगमगीत प्रकाश आहे.

56 ते मोशेच्या दिवसाच्या प्रकाशात राहत होते. तो काय म्हणाला? ते...तो म्हणाला, "आम्ही मोशेचे शिष्य आहोत."

57 तो म्हणाला, "जर तुम्ही मोशेला ओळखले असते, तुम्ही मला ओळखले असते. मोशेने माझ्याविषयी लिहीले!"

58 जर तुम्ही लुथरला ओळखले असते, तर तुम्ही ह्या युगालाही ओळखले असते, जर तुम्ही मेथॉडीस्टना ओळखले असते, तर तुम्ही हे युग ओळखले असते! कारण ख्रिस्ताने ह्या युगाविषयी लिहीले जी वचने पूर्ण होत आहेत. ती ह्या युगात पूर्ण झालीच पाहीजे. तेथे ती अनुवाद करण्यासाठी कोणाचीही गरज नाही, देव त्याचा अनुवाद करतो. देव स्वयं त्याचा अनुवाद करतो, कारण तो एकटाच असा आहे जो त्याचा अनुवाद करु शकतो. देवाची अभिवचने सदैव त्याने सांगितलेल्या गोष्टी प्रकट करतात, आणि तोच त्याचा अनुवाद आहे.

59 आता, येशू, (वेळ वाचविण्यासाठी), येशू म्हणाला, योहान 14वा अध्याय, 12वे वचन, "मी जी कृत्ये करितो, ती माझ्यावर विश्वास ठेवणाराही करील." त्याने हे सांगितले का? ते खरे आहे. त्याचा अनुवाद करण्याची काही गरज नाही. जेव्हा कोणी ते काम करतो. तेथे निश्चितच देव आहे!

60 त्याने तेथे असेही म्हटले, "जसे लोटाच्या दिवसात होते, तसे मनुष्याचा पुत्र प्रगट होण्याच्या दिवशी होईल." येशू तसे म्हणाला. ते तो बोलला काय? खचितच, तो बोलला! ते अनुवाद करण्याची गरज नाही.

ते म्हणाले, "त्याचा अर्थ..."

61 जे तो बोलतो तसेच तो तंतोतंत करतो! "जसे लोटाच्या दिवसात होते, तसे मनुष्याचा पुत्र प्रगट होईल त्या दिवसात होईल." लोटाच्या दिवसांबद्दल काय? आपण थोड्या वेळाकरिता मागे जाऊया, शोधू या ते काय करीत होते.

62 लोटाच्या दिवसांत तीन प्रकारचे लोक होते. विश्वासी, बनविले गेलेले विश्वासी, आणि अविश्वासी तसेच सगळीकडे आहे.

आपण पाहतो की सदोमातील लोक अविश्वासी होते.

लोट हा बनविलेला विश्वासी होता.

63 अब्राहाम हा विश्वासी होता. त्याच्याशी करार केला होता. तो अभिवचनाच्या संतानाची वाट पाहत होता. तो त्याची अपेक्षा करीत होता. आमेन. (मी स्वतःहून "आमेन" करीत नाही, *आमेन* म्हणजे "तसे होवो!") आणि ते खरे आहे. अब्राहाम सदोमात नव्हता. अब्राहाम सदोमाच्या बाहेर होता. तो आजच्या आत्मिक चर्चचे प्रतिक आहे.

64 लोट हा सदोमातील संप्रदायातील मंडळीचे दर्शक आहे. निरिक्षण करा, पवित्र शास्त्र तसे सांगते, "सदोमाच्या पातकामुळे त्याचा नीतिमान जीव रोज कासावीस होत होता." त्याच्यामध्ये ह्या सर्व गोष्टींविरुध्द उभे राहण्याची हिम्मत का नव्हती? तेथे आज मंडळीत खूप चांगले लोक बसले आहेत, ते पाहत आहेत की स्त्रीया तोकड्या पँट्स घालीत आहेत. आणि पुरुष अशाच गोष्टी करीत आहेत, आणि त्यांचे सभासद रविवारी मंडळीत येण्याऐवजी फिरत आहेत, गोल्फ खेळत आहेत, आणि सहली, मेजवान्या करीत आहेत आणि पोहत आहेत आणि अनेक गोष्टी. बुधवारी रात्री प्रार्थनेला जाण्याऐवजी घरी बसून टेलीविजन पाहत आहेत. त्यांना अशा गोष्टींविषयी त्यांना बोलावेसे वाटते, परंतु मंडळ त्यांना बाहेर काढुन टाकील असे त्यांना वाटते, हे काय आहे? ते पुन्हा लोटासारखे वागतात, होत असलेली पातके खिडकीतून पाहत बसतात आणि पापाला "पाप" म्हणून म्हणण्यास घाबरतात!

65 अब्राहाम त्यांच्या गोंधळात नव्हता, तो त्याच्याबाहेर होता. तो आत्मिक चर्चचे दर्शक आहे. पाहा, शेवटी काय झाले, जेव्हा आकाशातून अग्नी पडला. आणि ते परराष्ट्रीय होते. ते आज परराष्ट्रीयांवर पडणाऱ्या अग्नीचे प्रतिछाया आहे, जेव्हा राज्य कोसळेल आणि ते जळले जातील. "आकाशातून अग्नी पडेल!," प्रभू म्हणतो, "आणि ते तीव्र उष्णतेने जळतील." तिच त्याची छाया आहे.

66 आता आपण त्यांचे चित्र पाहूया. येथे अब्राहाम बाहेर आहे. सदोमात नाही, तो सदोमाबाहेर होता. लोट अजूनही सदोमात होता.

67 विचित्र गोष्ट, एके दिवशी भर उन्हाच्या वेळी 11 वाजले असतील, त्याने पाहीले तीन पुरुष येत आहे, सामान्य पुरुष, रस्त्यावर चालून येत आहेत. अब्राहाम ओक झाडाच्या खाली बसला होता, विश्रांती घेत होता. तो कदाचित त्याची गुरे चरण्यासाठी सकाळी

बाहेर घेऊन गेला असेल आणि दुपारच्या वेळी आला असेल. आणि त्याने तीन पुरुष येत असलेले पाहीले. आणि त्या पुरुषांमध्ये काहीतरी विशेष होते, की त्याच्या मनात घंटा वाजली. ओह माझ्या!

68 देवाच्या बाबतीत, नेहमीच काहीतरी विशेष असते, जेव्हा ते लोकांमध्ये येते, तेथे घंटा वाजते. तेथे ती त्यांना काहीतरी सांगते, तेथे काहीतरी समर्थन आहे.

69 अब्राहम त्वरीत धावत गेला, आणि म्हणाला, "माझ्या प्रभू, आत या आणि मला थोडे पाणी आणू द्या. तुम्ही आपले पाय धुवा आणि थोडी भाकर खा, मग पुढे जा." म्हणून तो गेला. तो गुरांकडे धावत गेला आणि त्याने एक चांगले कोवळे वासरु मारीले, चाकराकडे रांधण्यासाठी दिले. तो डेऱ्यात सारेकडे जाऊन म्हणाला तीन मापे सपीठ लवकर घे व ते मळून त्यच्या भाकरी कर. ते बाहेर आणले आणि त्यांना वाढले, जेव्हा तो तेथे बसला होता, खात होता, त्यांनी पाहीले, की ह्या मनुष्याची नजर खाली सदोमाकडे आहे. आणि तो म्हणाला...

70 त्यातील दोघेजण लक्षात घ्या, खाली सदोमात गेले. दोघे सदोमात गेले. कृपया आपले लक्ष विचलित करु नका. मी येथे संदर्भ देत आहे की येशू काय बोलला त्यातील दोघे सदोमात लोटाला बाहेर काढण्यासाठी तेथून बाहेर येण्यासाठी तयार होते त्यांना आणावयास गेले. आणि ते दोघे तेथे गेले, तेथे गेले आणि प्रचार केला. (आणि एक तेथे अब्राहामाकडे राहीला चिन्ह पाहा जे त्याने तेथे केले.) तेथे त्यांनी चिन्हे केली, सदोमी लोक पूर्ण आंधले होते, सुवार्तेचा प्रचार अविश्वासणार् याला नेहमीच आंधळे करतो. आणि पाहा तेथे काय झाले.

71 आता, तेथे जो एक मागे उभा राहिला आणि अब्राहामापुढे चिन्हे केली.

72 तुम्ही कधी पाहीले आहे की? कोणी इतिहासकाराने पवित्रशास्त्राचे अनुसरण केले, इतिहासाचे अनुसरण केले, मंडळ्यांच्या युगात असे कधीच घडले नाही की कोणी मनुष्य जगातील सामान्य मंडळीत गेला, संप्रदायामध्ये असा कधीच मनुष्य झाला नाही ज्याच्या नावाचा शेवट अशाप्रकारे होतो. जसे अब्राहाम, हा–म. परंतु आज त्यांच्याकडे एक आहे, ग्रा–ह–म. ते बरोबर आहे. तेथे ते खाली गेले, त्यांना बाहेर बोलावीत होते. तो ते काम चांगले करत होता. ग्राहम, बीली ग्राहम, देवाचा सेवक तेथे संप्रदायामध्ये, राजकारणी आणि असेच आणखी, ते उत्कृष्ट होत आहे.

73 दुसऱ्या दिवशी जेव्हा त्यांची इच्छा होती की त्याने अध्यक्ष म्हणून उभे राहावे, त्याने स्पष्ट नकार दिला. देव, त्यासाठी त्यास आशीर्वादीत करो. का, त्या दारुच्या कंपन्यांचे कार्य तो बंद करु शकत नव्हता. त्यांनी लाखो डॉलर्स त्यावर खर्च केले असते, कारण त्याने कसेही त्यांना बाहेर ठेवले असते, त्या सिगरेट कंपन्या अशाच गोष्टी. पाहा तो तेथून बाहेर आहे कारण देवाचा संदेशवाहक सदोमात गेला आहे. ते अगदी बरोबर आहे.

74 परंतु लक्षात घ्या, तेथे एक होता जो अब्राहामाबरोबर राहिला, दूसरा पुरुष, त्या दोघांसारखा नाही जे तेथे खाली गेले जसे आधुनिक सुवार्तिक ते तेथे खाली प्रचार करण्यासाठी गेले. पाहा, तेथे एक होता जो वर राहिला. दोघे *खाल*च्या *मार्गाने* गेले, आणि एक अब्राहामा*बरोबर राहिला*. आणि जो एक अब्राहामाबरोबर राहिला त्याने त्याला चिन्ह दिले.

75 आता लक्ष द्या, त्याचे नाव "अब्राम" होते आणि त्याच्या पत्नीचे "साराय" होते, त्याच्या एक किंवा दोन दिवसां अगोदर देव अब्राहामाकडे आला होता आणि त्याला म्हणाला, "मी तुझे नाव बदलून अब्रामचे अब्राहाम करीत आहे." (पाहा G–r–a–h–

a–m चे इंग्रजी सहा मुळाक्षरे आहेत, मनुष्य) परंतु A–b–r–a–h–a–m सात मुळाक्षरे आहेत; शेवट h–a–m ने होते आहे.

76 आता, वर येथे आध्यात्मिक मंडळीत, अब्राहामाकडे वर तेथे एक गेला होता, आणि पाहा तो काय म्हणाला. तो म्हणाला "अब्राहाम" ("अब्राम" नाही) "अब्राहाम, तुझी बायको कोठे आहे" ("साराय" नाही) "सारा? तुझी बायको सारा कुठे आहे?"

77 पाहा, तो काय म्हणाला, "ती पाहा, डेऱ्यात आहे."

78 आणि तो म्हणाला, "मी तुला भेट देईन. मी तुझी भेट घेईन." पाहा ते वयक्तिक सर्वनाम, एक, त्याच्या अभिवचनाप्रमाणे जे त्याने केले होते. तो देव होता! तो म्हणाला, "मी तुला भेट देईन."

79 आणि सारा, (ज्याप्रकारे आपणा सर्वांना समजले) मनातल्या मनात हसली, ती म्हणाली, "मी जख्ख म्हातारी झाले आहे, शंभर वर्षांची, माझा धनीही" (जो अब्राहाम होता) "वृध्द झाला आहे, तरुणासारखा जगण्याचा वेळ निघून गेला आहे." म्हणाली, "तर आता मला हे सुख मिळेल काय, मी वृध्द आहे व तोही वृध्द आहे." आणि म्हणाली "आपल्याला ते होऊ शकत नाही." आणि म्हणाली, "कसे? ह्या गोष्टी होऊ शकत नाही!"

80 आणि तो—तो मनुष्य (देव मानवी देहात) म्हणाला, "सारा का हसली आणि संशयीत झाली, ह्या गोष्टी बोलली?" डेऱ्यात, त्याच्यामागे.

81 आता पाहा, जर ती तीच सेवकाई नसती जी येशू ख्रिस्ताने केली होती! त्याने प्रेक्षकांकडे पाहिले आणि त्यांचे विचार ओळखले. त्याने पेत्राला सांगितले की तो कोण होता आणि त्याच्या वडिलांचे नाव काय होते. नथनेलाला सांगितले.

82 विहीरीपाशी असलेल्या स्त्रीस सांगितले, जेव्हा ती बोलली...तो म्हणाला, "मला प्यावयाला पाणी दे," किंवा "माझ्यासाठी पाणी आण."

83 ती म्हणाली, "महाशय, यहूदी शोमरोनी लोकांशी बोलण्याची रीत नाही. कारण ते आमच्याशी संबंध ठेवीत नसतात."

84 तो म्हणाला, "मला प्यावयास पाणी दे, असे तुला म्हणणारा कोण आहे हे तुला कळले असते, तर तू त्याच्याजवळ प्यावयास मागितले असते." त्यांचे संभाषण चालू राहिले. तो म्हणाला, "तू जाऊन आपल्या नवऱ्याला बोलावून आण."

ती म्हणाली, "मला नवरा नाही."

तो म्हणाला, "हे तू ठीक बोललीस, कारण तुला पाच नवरे होते."

ती म्हणाली, "महाराज!"

85 त्याच्यातील फरक पाहा त्या दिवसातील पादरी, ती—ती परिषद जी त्या दिवसाच्या प्रकाशात राहात होती. ते म्हणाले, "हा सैतान आहे!" त्यांना त्यांच्या मंडळीस उत्तर द्यावे लागत होते, कारण त्याची गरज होती.

86 परंतु त्या गरीब लहानशा स्त्रीने काय केले, पूर्वनियोजीत बीज तिच्या हृदयात होते... ती आजारी होती आणि अशा लोकांना कंटाळली होती, ती एका वेश्येप्रमाणे रस्त्यावर राहात होती. परंतु जेव्हा तिने ते पाहिले, ती म्हणाली, "महाराज, आपण संदेष्टे आहात हे आता मला समजले. आमच्याकडे चारशे वर्षांपासून एकही नव्हता आणि आम्हाला सांगण्यात आले आहे की जेव्हा मसीहा येईल तेव्हा ह्या गोष्टी तो करील." ओह माझ्या! ते बीज जे तिच्यामध्ये होते त्यात जीवन आले! का? तेथे अनुवादाची गरज नव्हती.

87 येशूने म्हटले, “जो तुझ्याबरोबर बोलत आहे तो मी तोच आहे.” ते अनुवाद करण्याची गरज नाही. त्याने चमत्कार केले आणि ते त्याच्याविषयी साक्ष देत होते की तो मसिहा आहे, आमेन, आणि देवाने जी अभिवचने दिली आहेत त्याची तंतोतंत नोंद ठेवीत आहेत. (“प्रभू परमेश्वर तुमच्यामध्ये माझ्यासारखा संदेष्टा उभा करील,” मोशे म्हणाला.) ते काय होते? वचनाचे प्रकटीकरण!

88 ती नगरात धावत गेली, आणि म्हणाली, “चला, मी केलेले सर्व काही ज्याने मला सांगितले, तो मनुष्य पाहा. तोच ख्रिस्त असेल काय? तोच तो नाही काय? मी केलेले सर्वकाही त्याने मला सांगितले.”

89 आता पाहा, येशू, जो तेथे वर त्या मनुष्यामध्ये होते आणि ज्याची पाठ त्या डेऱ्याशी होती आणि सांगितले की सारा डेऱ्यामध्ये काय विचार करीत होती.

90 देवाचे वचन, इब्रीच्या, 4थ्या अध्यायात सांगते, तो हे म्हणाला, “देवाचे वचन सजीव, सक्रीय, कोणत्याही दुधारी तरवारीपेक्षा तीक्ष्ण असून, जीव व आत्मा, सांधे व मज्जा ह्यांना भेदून आरपार जाणारे आणि मनातील विचार व हेतू ह्यांचे परीक्षक असे आहे.” ते वचन आहे! आणि प्रत्येक वेळी संदेष्टा आला, तो वचन घेऊन आला आणि तो त्या युगाकरिता वचन होता. आणि ते काय करीत होते? एक भविष्यवादी जो मनातले विचार ओळखीत होता.

91 ते येशू ख्रिस्तामध्ये केले कारण तो वचनाची पूर्णता होता.

92 आणि येशू म्हणाला, “जसे सदोमाच्या दिवसात होते, तसे मनुष्याच्या पुत्राच्या येण्याच्या वेळेस होईल.” देवाचा आत्मा पृथ्वीवर मनुष्यावर येईल, देव मानवी देहात प्रकट झाला. आमेन! तुम्ही मनुष्याच्या स्वरुपात पाहता का आणि त्याच गोष्टी तो करील जे देवाने सदोमात मानवी देहात केले. लक्षात ठेवा, ते अभिवचनाच्या पुत्राची वाट पाहात होते. आणि त्याच्या लगेच नंतर, अभिवचनाचा पुत्र आला. ते शेवटचे चिन्ह जे सदोम व अब्राहामाच्या लोकांनी अभिवचनाचा पूत्र येण्याआधी पाहीले. तुम्ही ते पाहीलेत काय? आणि आता आध्यात्मिक मंडळी त्याच वेळेजवळ आली आहे.

93 कोणी म्हटले, “भाऊ ब्रॅन्हम तुम्ही म्हणालात काय की, ‘तो देव होता’?”

94 पवित्र शास्त्र सांगते की तो देव होता! त्यास अनुवादाची गरज नाही, तो एलोहीम आहे. अब्राहामाने त्याला असे म्हटले. पवित्र शास्त्र वाचणाऱ्याला ठाऊक आहे की *एलोहीम*, “सर्व काही पुरविणारा.” तोच पहिला, शेवटला, आदि, अंत आहे. एलोहीम! अब्रामहामाने त्याला “एलोहिम” म्हटले. देव (मोठ्या लीपीत हिब्रूमध्ये) एलोहीम, “सुरुवातीला देव,” एलोहीम.

95 तो एलोहिम मानवी देहात प्रगट झालेला, मानवी कपडे घातलेला, मानवी अन्न खाणारा आमेन! अंतिम दिवसात हे चिन्ह दिले की देव पुन्हा त्याच्या लोकांत मानवी देहात प्रगट होईल! आमेन! येशू म्हणाला, “जी कामे मी करितो ती तू ही करिशील. आणि जसे सदोमाच्या दिवसात होते, तसे मनुष्याच्या पुत्राच्या येण्याच्या दिवसात होईल.” आमेन! त्याला अनुवादाची गरज नाही; तेथे प्रकटीकरणाची गरज आहे, त्याचीच काय ती गरज आहे. आमेन. तुम्ही ह्यावर विश्वास ठेवता का?

आपण आपले मस्तक झुकवूया.

96 आमच्या स्वर्गिय पित्या, आम्ही तुला ह्या रात्री तुझे वचन देतो तू ह्या गोष्टी बोलल्यास. तू ती वचने दिली आहेत. तुझ्या वचनात जीवन कोणी घालू शकत नाही केवळ तूच. तू

म्हणाला, “तेथे प्रकाश होवो” आणि तेथे प्रकाश झाला. त्याचा अनुवाद करावा लागत नाही, ते प्रकट केले जाते.

97 जसे यशया संदेष्टा बोलला, “कुमारी गर्भवती होईल” ती झाली, येथे कोणत्याही प्रकटीकरणाची गरज नाही, तीने ते केले. तेच घडले.

98 तुम्ही म्हणालात, जेव्हा तो येईल तो बेथलहेमात जन्मास येईल, “हे यहूदाच्या प्रांता, बेथलहेमा, तू यहूदाच्या सर्व सरदारांमध्ये कनिष्ठ आहेस, असे मुळीच नाही, कारण इस्त्राएल लोकांचा प्रतिपाळ करील असा सरदार तुझ्यातून निघेल.”

99 ज्या गोष्टी तो करील, तो वधस्तंभावर कशासाठी रडेल, त्याच्यावर कशाप्रकारे दोषारोप करण्यात येतील, त्याच्या पायावर व हातांवर खिळे ठोकण्यात येतील, “तो आमच्या अपराधांमुळे घायाळ झाला, आमच्या दुष्कर्मांमुळे ठेचला गेला; आम्हास शांती देणारी अशी शिक्षा त्यास झाली; त्यास बसलेल्या फटक्यांनी आम्हास आरोग्य प्राप्त झाले.”

100 दाविद कशाप्रकारे हे बोलला, “तू माझा जीव अधोलोकात राहू देणार नाहीस; तू आपल्या भक्तास कुजण्याचा अनुभव येऊ देणार नाहीस.” आणि तिसऱ्या दिवशी, बहात्तर तास होण्याअगोदर त्याचे शरीर कुजण्याअगोदर, देवाचा शब्द बोलला, “तो उठेल,” (ते म्हणाले, की त्यांनी त्याचे शरीर चोरुन नेले, ते अजूनही असा विश्वास करतात) परंतु प्रभू आम्ही तुझ्या वचनावर विश्वास ठेवतो, ते प्रगट झाले. येशू ख्रिस्त पुनरुत्थित झाला. आणि म्हणाला, “मी...मी जगाच्या अंतापर्यंत सदैव तुम्हाबरोबर राहीन.”

101 आम्ही विश्वास करतो की तू आज रात्री येथे आहेस. आम्ही विश्वास करतो की तू येशू ख्रिस्तच आज रात्री, येथे आहेस, जसा तू होतास. तू फक्त डोळे, हात, पाय, तोंड, जीव, शरीरे शोधत आहेस, ह्यासाठी त्याचा उपयोग तुला प्रगट करण्यासाठी करशील. देवा, ह्या रात्री आम्हाला पवित्र कर, ह्यासाठी आम्ही जीवंत येशू ख्रिस्ताला आमच्यामध्ये जगताना पाहू. त्याला येऊ द्या. मग तसे होईल. ज्याप्रमाणे ते ग्रीक्स हेल्लणी त्या दिवशी भूकेले होऊन आले आणि म्हणाले, “महाशय, आम्ही येशूला पाहू.” आणि त्यांनी पाहीले. ते किती अद्भूत असेल जेव्हा त्यांनी त्याच्याकडे पाहीले.

102 परमेश्वरा, तू आजही तोच आहेस. आणि तू अभिवचन दिले आहेस की जर तुम्ही भूकेलेले आहात, आम्ही तुला पाहू शकू. “आणखी थोडा वेळ आणि जग मला पाहणार नाही” (अविश्वासी.) “पण तुम्ही मला पाहाल कारण मी तुम्हाबरोबर आहे, तुम्हामध्ये आहे, जगाच्या अंतापर्यंत.” आम्हाला ठाऊक आहे की तू काल, आज आणि युगानूयुग सारखा आहेस.

103 प्रभू, तुझी वचने सांगण्यात आली आहेत, ती लिहीण्यात आली आहेत, आता तसे घडू दे देवाच्या महिमेसाठी हे कळू दे की तो आपले वचन सदा पाळतो. आमेन. देव तुम्हास आशीर्वादीत करो.

104 मी प्रार्थना रांग बोलावणार आहे. मी विश्वास करतो की बीली म्हणाला, त्याने प्रार्थना पत्रे वाटली आहेत, एक ते शंभर किंवा तसेच काही. तो आता येथे नाही. प्रार्थना पत्राचा अंक काय आहे...कोणीतरी त्याच्या मागे पाहा...तेथे—तेथे अंक असेल आणि एक—आणि एक मुळाक्षर (ए, बी, सी, डी, किंवा...) ते काय आहे, ए? ठीक आहे.

105 आपण ए घेऊया, क्रमांक एक क्र. दोन, क्र. तीन, क्र. चार, पाच मला ते दिसत नाही उभे राहीलेले. प्रार्थना पत्रक क्रमांक चार, एक, दोन तीन. त्यांना उठता येत नसेल. जर त्यांना येत नसेल; कोणी तुमच्या शेजाऱ्याच्या पत्रकात पाहा, त्याच्याकडे पत्रक असेल

आणि त्याला उभे राहता येत नसेल. लवकर आता. तेथे ते आहे, चार पाच, प्रार्थना फक्त क्रमांक पाच, सहा, सात, आठ, नऊ, दहा, अकरा, बारा. जसा क्रमांक पुकारला जाईल तसे वर येण्यास सुरुवात करा. क्रमांक एक, दोन, तीन या मार्गाने या. प्रार्थना पत्रक क्रमांक एक, दोन, तीन, चार, पाच, सहा, सात, आठ, नऊ, दहा, अकरा, तुमची जागा घ्या. अकरा, बारा, तेरा, चौदा, पंधरा, सोळा, सतरा, अठरा, एकोणीस, वीस, एकवीस, बावीस, तेवीस, चोवीस, पंचवीस. तेथे कोणी...

106 मी एका तरुणाला तेथे मागे व्हीलचेअरवर पाहत आहे. जर तुझा क्रमांक पुकारला असेल, मुला, आणि—आणि जर तुला मिळत नसेल...ठीक आहे फक्त तुझा हात वर कर, आम्ही पाहू तुला येथे आणावे म्हणून. पाहा?

107 येथे असे कितीजण आहेत जे आजारी आहेत आणि त्यांना प्रार्थना पत्रक मिळाले नाही. मला तुमचे हात पाहू द्या. येथे आहे. तुम्ही आपले हात वर करा. तुम्ही विश्वास करता का? ते तेथे एकत्र होत असताना तुम्ही विश्वास करता का तो काल, आज आणि युगानुयुग सारखा आहे? किती जण? ह्या सेवकांना पाहा, आज वचन हे सांगत नाही का, स्वकीयांनो, तो महायाजक आहे ज्याला आपल्या व्याधींच्या भावनेद्वारे स्पर्श करु शकतो? ते बरोबर आहे. कितीजण हे विश्वास करतात तुमचे हात वर करा. तो महायाजक आहे आपल्या व्याधींच्याद्वारे त्याला स्पर्श करु शकतो.

108 मग जर शास्त्र सांगते, “तो काल, आज आणि युगानुयुगसारखा आहे.” ह्यावर किती जण विश्वास ठेवतात? मग तो आज कसे वागेल? त्याला तसेच वागावे लागेल. जे त्याने काल केले. हे बरोबर आहे? आज ह्या रात्री तो कोठे आहे? तो सर्वसमर्थाच्या उजवीकडे बसला आहे. त्याचे शरीर; त्याचा पवित्र आत्मा ह्या येथे इमारतीत आहे, त्याची ओळख करुन देण्यासाठी.

109 आता पाहा. जेव्हा कोणीतरी त्याच्या वस्त्राच्या गोंड्याला स्पर्श केला, एके दिवशी त्या स्त्रीने, तेव्हा काय घडले? तिच्याकडे प्रार्थना पत्र नव्हते, असे आपण म्हणूया, परंतु तिचे त्याच्या वस्त्राला स्पर्श केला. आणि जेव्हा तिने त्याच्या वस्त्राला स्पर्श केला, येशूने वळून पाहीले आणि म्हणाला. “मला कोणी स्पर्श केला?”

110 पेत्राने त्याचा निषेध केला आणि म्हणाला, “लोकसमुदाय आपणाभोवती गर्दी करीत आहे हे आपण पाहता काय सर्वजण आपणास स्पर्श करु इच्छितात. तरी आपण म्हणता, ‘मला कोण शिवले?’”

111 तो म्हणाला, “आपणामधून शक्ति निघाली आहे हे मी ओळखले.” कितीजणांना हे माहीत आहे? *सद्गुण*, ज्याचा अर्थ “शक्ति,” त्यामधून निघाली. “मी अशक्त झालो, कोणीतरी मला शिवले वेगळ्याच प्रकारचा स्पर्श.” त्याने सभोवार पाहीले लोकसमुदायात हे शोधण्याकरिता की विश्वासाचा स्त्रोत कोठे आहे.

112 सगळेजण आपले हात त्याच्याभोवती ठेवीत होते, “गुरुजी, आम्ही तुझ्यावर विश्वास ठेवतो.” आणि सगळेच.

113 परंतु तेथे कोणीतरी होते ज्याचा खरा विश्वास होता. आणि ती विश्वास करीत होती की जर मी ह्याच्या वस्त्रांना शिवले तरी मी बरी होईन. कारण ती हृदयात म्हणत होती की जर मी हे केले तर ते असे घडेल.

114 तो वळला आणि जिने हे केले होते तिला पाहावयास त्याने सभोवर बघितले, आणि तो तिला म्हणाला...तिचा रक्ताचा झरा लागलीच सुकून गेला आणि ती बरी झाली. हे बरोबर आहे का? अशाप्रकारे लोकसमुदायात त्याने केले.

115 आता, मी दावा करितो की तो मृत नाही, तो आजही जीवंत आहे जसा तो ह्याआधी होता. आणि पवित्र शास्त्र सांगते, येशू स्वत: म्हणतो, "जसे सदोमाच्या दिवसात झाले, तसे मनुष्याचा पुत्र प्रगट होईल त्या दिवशीही होईल."

116 आता पाहा, वर देवाकडे किती प्रकारची दाने आहेत ह्याच्याशी आपल्याला काही करायचे नाही, परंतु तेथे खाली एक आहे त्यावर प्रतिसाद देण्यासाठी तो शहरात गेला, पवित्रशास्त्र सांगते, "त्यांच्या अविश्वासामुळे त्याला पुष्कळ गोष्टी तेथे करता आल्या नाही." हे बरोबर आहे? आजही तसेच आहे. तुम्ही त्याच्यावर विश्वास ठेवला पाहीजे तुम्ही त्याच्यावर विश्वास ठेवला पाहीले. तोच एक मार्ग आहे जो तुम्ही करु शकता.

117 प्रार्थनेची रांग तयार आहे का? आता प्रत्येकजण आदराने दहा मिनिटे येऊया. ठाऊक नाही मला तेथपर्यंत पोहचता येईल, माझ्याकडे अंदाजे पंचवीस किंवा तीस जण उभे आहेत. परंतु आता. प्रार्थना रांगेत उभे राहणार प्रत्येक जण माझ्यासाठी अनोळखी आहे आणि मला त्यांच्याविषयी काहीच माहीत नाही. तुमचे हात वर करा. प्रार्थना रांगेत उभे असणाऱ्या प्रत्येकाने.

118 आता बाहेर प्रेक्षकांमध्ये, ज्यांना माहीत आहे की मला तुमच्याविषयी काहीच ठाऊक नाही त्यांनी हात वर करा. आता, येथे हेच तुम्हाला मी सांगण्याचा प्रयत्न करीत आहे, मित्रा, पाहा. आता, हेच आहे. सर्व सेवक मंचावर येथे आहेत. आणि ख्रिस्ताने अभिवचन दिले आहे. पाहा असे लिहीले आहे. हे केव्हा घडणार आहे? शेवटच्या दिवसात, प्रभूच्या येण्याअगोदर. ते बरोबर आहे का? ते तेव्हाच घडेल.

119 आता, ते हेच वचन आहे. ज्याद्वारे आजची भविष्यवाणी केली होती. तो लूथरनचा प्रकाश नाही, वेस्लीचा प्रकाश नाही; आणि पेंटेकॉस्टचा प्रकाशही नाही. तो पुढे वर गेला आहे. आता, लुथरन बरोबर आहेत; मेथॉडिस्ट बरोबर आहे; बाप्टिस्ट बरोबर आहे; पेंटेकॉस्टल, चांगले आहेत. आज रात्री ते सर्व येथे बसले आहेत. ते—ते व्यक्ती नाहीत. काय असते...

120 तुम्ही मेथॉडिस्टना लुथरविषयी कधीच सांगू शकत नाही, कारण तो पवित्रीकरणात विश्वास ठेवतो आणि लुथर ठेवीत नाही. पाहा?

121 तुम्ही पेंटेकॉस्टला असे कधीच सांगू नका की, "पवित्रीकरणच सर्वकाही आहे," त्याने वरदाने परत आलेली पाहिली आहेत. तो त्यावर विश्वास ठेवणार नाही. नाही, त्याच्याकडे त्याहीपेक्षा जास्त आहे. पाहा? आणि ते मंडळीचे शेवटचे युग ज्यात आपण आहोत, आणि पवित्र शास्त्र सांगते त्यानंतर आणखी मंडळीची युगे नसणार.

122 परंतु तेथे लोकसमुदाय जमणार, पाहा, आणि आपण येथे आहोत. आता, लक्षात घ्या, शेवटचे चिन्ह आपण अभिवचनाच्या पुत्राची वाट पाहत आहोत का? तुमचे हात वर करा. तुम्ही विश्वास करता का की तुम्ही ख्रिस्तामध्ये असल्याकारणाने अब्राहामाचे बीज आहात? तुमचे चिन्ह स्विकारा! ते बाहेर बाबेलात नाही, ते तेथे संप्रदायातील जगात नाही. ते येथे तुमच्यात आहे, जे तेथे त्या बाहेरच्या गोंधळात नाहीत. विश्वास करा!

123 येथे एक स्त्री आहे, ती मला पूर्ण अनोळखी आहे. कोठेतरी ह्याच युगात. मी ह्या स्त्रीला माझ्या जीवनात कधी पाहीले नाही. जर मी त्या स्त्रीला बरे करु शकेन, ते मी करीन, जर ती आजारी असेल. मला तिच्याविषयी काहीच ठाऊक नाही. काही मिनिटांआधी तुम्ही तिला तिचा हात उंचावताना पाहीले का? मी—मी तिला कधीही पाहिले नाही. ती स्त्री तेथे उभी आहे.

124 आज ते येथे खाली आले आणि प्रार्थना पत्रे एकत्र आणलीत, त्या सर्वांना एकत्र करा आणि ते लोकांना द्या. एकाचा क्रमांक येथे एक आहे, आणि क्रमांक दहा मागे तेथे आहे, क्रमांक पंधरा, क्रमांक सात, क्रमांक...अशाच प्रकारे. प्रत्येक दिवशी ते सर्व तुमच्या समोर, मिसळले जातात. आणि जेव्हा ते बोलावले जातात, ते सर्व ठिकाणाहून बोलावले जातात. पाहा? आणि आता तुमच्याकडे प्रार्थना पत्र असण्याचीही आवश्यकता नाही, फक्त तेथे बसा आणि विश्वास ठेवा. का तुम्ही...

125 तुम्ही आजच्या रात्री तुम्हाला जागृत करा, आपण कोणत्या समयात राहत आहोत त्याचा शोध घ्या. पाहा? मित्रा, ते सर्व संपण्याच्या बेतात आहे, संपण्याच्या बेतात आहे!

126 आता, जर अब्राहामाच्या देवाने येशू ख्रिस्ताला मेलेल्यांतून उठविले, आणि येशूने अभिवचन दिले की शेवटच्या दिवसात तीच चिन्हे...जी त्या दूताने (जो देव मानवी देहात होता) अब्राहामासमोर केली, अभिवचनाची संतान येण्यापूर्वी, येशूने म्हटले त्याच गोष्टी आजही घडतील.

127 आज, आपण आण्विक आणि संप्रदाय पाहतो, आणि ते सगळे, आणि गोंधळ ज्यात ते आहे. आपण बीली ग्राहमला खाली पलिकडे पाहतो, आणि ओरल रॉबर्टस, आणि बाहेर तेथे सर्व लोक, पेंटेकॉस्टल संदेशवाहक आणि संप्रदायाचे संदेशवाहक तेथे, आपण पाहतो सगळे जात आहेत, चिन्हे त्याच्याकडे आहेत. बीली ग्राहम, देवविषयक ज्ञानात प्रविण ज्यावर संप्रदायांचा विश्वास आहे. ओरल रॉबर्टस, चंगाई देणारा, जसे पेंटेकॉस्ट करतात...

128 परंतु येथे पाहा, अब्राहामाच्या बीजासाठी एक वगळेच अभिवचन आहे. तेथे त्या संप्रदायात ते आहे, तेथे काही गोष्टी संप्रदायाच्या *बाहेर* होणे आवश्यक आहे, लोकांनी जमणे. आपण ते येथे सोडू या उद्या रात्रीपर्यंत.

129 पाहा, मी त्या स्त्रीला ओळखत नाही. मी माझी पाठ तिच्याकडे करतो. जर प्रभू परमेश्वर त्या स्त्रीला काही सांगेल, मग ते—ते कौटुंबिक असेल, आर्थिक असेल, आजार असेल; मला माहीत नाही. तीला कळेल की ते खरे आहे किंवा नाही.

130 जर तो आज रात्री त्याच गोष्टी करील ज्या त्याने तेव्हा केल्या, तुम्ही देवावर विश्वास कराल का की अभिवचनानुसार तो येशू ख्रिस्त येथे शेवटच्या दिवसात असेल? कितीजण विश्वास ठेवतात की आपण सदोमासारख्या ठिकाणी राहात आहोत, जेव्हा संपूर्ण जग सदोमातील स्थितीमध्ये जाईल? मी आज रात्री जे तुम्हाला सांगितले आहे ते सत्य आहे ह्यावर तुम्ही कितीजण विश्वास ठेवतात? मग, अब्राहामाची लेकरे आणि बीज देवावर, विश्वास ठेवा!

131 आता, ते तुमच्या मनातून निघून जाईल की मी त्या स्त्रीला काहीतरी सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. तिच्या चेहऱ्याकडे पाहून, किंवा ह्या सर्व गोष्टींविषयी टेलीपथीद्वारे मिळवीत आहे, किंवा तुम्हाला जे काही जाणून घ्यायचे आहे. कोणी आहे जे जाणतात की ह्यापेक्षा टेलीपथीमध्ये अधिक ज्ञान आहे. पाहा? तुम्ही कधी मनातील विचार ओळखणाऱ्यास सुवार्ता प्रचार करताना पाहिले आहे का? तुम्ही कधी आध्यात्मिक मनुष्याला सुवार्ता प्रचार करताना पाहिले आहे, चिन्हे व चमत्कार करताना, घोषणा करताना, की येशू ख्रिस्त तोच आहे? नाही.

132 पाहा, ते फक्त...ते लोकांच्या मनात आहे. पाहा ते आंधळे आहेत. तुम्ही विश्वास ठेवता का की ते आंधळे असू शकतात? पवित्र शास्त्र सांगते ते असतील. हे बरोबर आहे का? "हूड, गर्वाने फुगलेली, देवावर प्रेम करण्याऐवजी सुखविलासाची आवड धरणारी,

विश्‍वास घातकी, चहाडखोर, असंयमी, चांगल्याबद्दल प्रेम न बाळगणारी, सुभक्तीचे केवळ बाह्यरुप दाखवून तिचे सामर्थ्य नाकारणारी."

133 येशूने सांगितले नाही काय, संत मत्तय मध्ये 24:24, ते दोन आत्मे शेवटल्या काळी शक्य होईल तर निवडलेल्यांस देखिल फसवतील? परंतु ते शक्य नाही. ते देवाच्या विचारात प्रारंभीच होते, आणि ते देवाचा भाग आहेत.

134 आता, अब्राहाम, इसहाक आणि यकोबाच्या देवा, ह्यारात्री सर्वांना कळू दे की मी तुझ्याविषयी सत्य तेच सांगत आहे. तो तू आहेस, प्रभू. नम्रतेने तुझ्या दासास भर की त्याचे स्वतःचे विचार दूर होतील, तु आमचा उपयोग तुझ्या गौरवासाठी करशील. देवाचा पुत्र, येशू नावाने मागतो, आमेन.

135 दान काय आहे? असे काही नाही जे तुम्ही घेता, आणि बारिक तुकडे करता आणि गोल फिरवता नाही. नाही. हे समजणे की स्वतःला कशाप्रकारे बाहेर काढणे की देव तुमचा उपयोग करु शकेल. एक वरदान म्हणजे स्वतःला बाजूला सारणे. मग देव त्याचा उपयोग करतो.

136 माझ्यामागे असलेली बाई ह्यावेळी मरणार आहे जर तीला आरोग्य मिळाले नाही तर...माझ्यामागे असलेल्या स्त्रीसाठी दुसऱ्या मनुष्याद्वारे आताच प्रार्थना करण्यात आलेली आहे. तिला कर्करोग झाला आहे. कर्करोग तिच्या स्तनात आणि तिच्या फुप्फुसातही झाला आहे. तिच्यासाठी आताच प्रार्थना करण्यात आली होती, आणि तिला आरोग्य मिळाले आहे हे विश्वासाद्वारे स्विकारण्याचा प्रयत्न करीत आहे. **प्रभू परमेश्‍वर असे म्हणतो!** बाई, हे खरे आहे का? [ती बाई म्हणते, "हो, ते नक्कीच खरे आहे."—संपा.] जर तसे आहे, आपले हात हलवून प्रेक्षकांना दाखव. अब्राहामाचा परमेश्‍वर आजही जीवंत आहे! ठीक आहे. जा विश्‍वास ठेव, ज्यावर तू विश्‍वास ठेवला आहे आणि तुला बरे वाटेल. आमेन.

तुम्ही विश्‍वास करता का? तुम्ही सांगा, "प्रेक्षकांबद्दल काय?"

137 ती स्त्री येथे बसली आहा...रांगेच्या शेवटी, तेथून दूसरी स्त्री. जेव्हा मी सभोवती वळलो, तेथे मी काहीतरी पाहीले, एक गोष्टी तिच्या दंडाभोवती, रक्तदाब खेचत आहे. तिला उच्च रक्तदाब आहे. बाई हे बरोबर आहे का? तुमचा हात वर करा. जर तू विश्‍वास ठेवशील तर तुझा रक्तदाब खाली येईल. अब्राहामाचा परमेश्‍वर आजही दृश्य आहे. तो तोच आहे जसा तो होता, देवाचा शब्द ह्या दिवसासाठी!

138 तू कशी आहे? तू आता विश्‍वास करतेस? देवावर विश्‍वास ठेव! लहान बालकासारखे व्हा. देव तुमचे अंतकरण जाणतो. तरुण महिले, मी जाणत नाही. तू विश्‍वास ठेवतेस काय तुझी काय समस्या आहे हे देव मला प्रकट करण्यास समर्थ आहे? जर मी तुला ते सांगितले तर तू त्याच्यावर विश्‍वास ठेवशील काय? ते तुझ्यासाठी नाही, ते दुसऱ्या कोणाकरिता आहे तो तुझा भाऊ आहे. आणि तो खूप गंभीर आहे आणि तो शहराच्या उत्तरेबाजून तुलारे येथे आहे. आणि तो इस्पितळात आहे, आणि त्याला रक्ताचा कर्करोग झाला आहे, आणि डॉक्टरांनी त्याला मरणासाठी सोडले आहे. तेथे कुठलीच आशा उरली नाही. ते बरोबर आहे. तू विश्‍वास ठेवतेस काय? [ती बाई रडत म्हणाली, "होय"—संपा.] ठीक आहे. तुझ्या हातात काय आहे? ते घे आणि ते त्याच्यावर ठेव आणि त्यावर अविश्‍वास करु नको. विश्‍वास ठेव! आमेन!

139 तुम्ही विश्‍वास ठेवता का? मी ह्या महिलेला माझ्या आयुष्यात कधीही पाहिले नाही, परंतु देव हा देवच असतो! आता, मला सांगा एक मनुष्य ते करु शकतो का? मनुष्याला तसे बनविले नाही की त्याने हे करावे. तो देवच आहे ज्याविषयी येशू ख्रिस्ताने अभिवचन दिले

की येथे अंतिम दिवसात असे होईल आणि तो स्वतःला प्रगट करील (फक्त अब्राहामाच्या बीजासमोर) जसे ते सदोमाच्या दिवसात होते.

140 आता येथे, मी त्या महिलेला ओळखीत नाही, आम्ही एकमेकांसाठी अनोळखी आहोत. मला वाटते ही आमची आयुष्यातील पहिलीच भेट आहे. तू माझ्यावर देवाचा सेवक म्हणून विश्वास ठेवतेस काय? [ती महिला म्हणते, "होय."—संपा.] हे वचन आहे ह्यावर तू विश्वास ठेवतेस काय? ["होय."] आणि तुला माहीत आहे की जर...हे वचन आजही मनातील विचार व हेतू ह्यांचे परीक्षक आहे. हे बरोबर आहे? ["हे बरोबर आहे."] हे वचन चंगाई देणारेही आहे, जर तू ह्यावर विश्वास ठेवला तर. तू ठेवतेस. तुझ्यावर छाया आहे, गडद छाया आहे. तो कर्करोग आहे. आणि तू विश्वास ठेवतेस काय की तो कर्करोग कुठे आहे हे देव मला सांगू शकतो? तो लहान आतड्यामध्ये आहे. असे डॉक्टर म्हणतात. तू विश्वास करतेस काय की तू बरी होशील? ["आमेन."] जा, आणि बिल्कुल संशयी होऊ नको, आणि देव तुला बरे करील. आमेन.

141 तुम्ही सगळे विश्वास करता का? अगदी तसेच जसे त्याने करण्याचे अभिवचन दिले आहे! देवावर विश्वास ठेवा, संशयी होऊ नका.

142 आपण एकमेकांस अनोळखी आहोत मी तुला ओळखीत नाही. जर आपण अनोळखी आहोत, तर हे प्रेक्षकांना कळू दे. आपण आपले हात पकडूया. त्या स्त्रीस मी माझ्या आयुष्यात कधीही पाहीले नाही.

143 तुम्ही तेथे बाहेर विश्वास ठेवता का? तुम्ही विश्वास ठेवता का तो येशू ख्रिस्त आहे? ते काय आहे? ते त्याचे वचन आहे. जेव्हा ह्या लोकांनी त्याला नाकारले, त्यांनी मनुष्याला नाकारले नाही, तर त्यांनी वचनाला नाकारले. ते वचन होते जे बाहेर होते, ते परत आत येऊ शकले नाही.

144 आता, ती महिला मझ्यासाठी अनोळखी आहे. मी तिला माझ्या जीवनात कधीही पाहिले नाही. देव आरोग्य देणारा आहे. ते कदाचित आरोग्यासाठी आले नसतील, दुसऱ्या कशासाठी आले असतील, परंतु तुमची समस्या काय आहे हे देव मला समजावतील, तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवाल काय? पहिली गोष्ट ज्यासाठी तुम्हाला प्रार्थना हवी आहे, ती तुम्हाला कानाने कमी ऐकावयास येते. तुझ्या एका कानाने, तू ऐकू शकत नाही. हे बरोबर आहे. ते खरे आहे. आणि तुला एक सवय आहे, आणि तुला त्या सवयीपासून छुटकारा हवा आहे, ते धुम्रपान आहे. तू आता आपले बोट तुझ्या चांगल्या कानात ठेव ठीक आहे, तुझ्या चांगल्या कानात. ठीक आहे. आता देवावर विश्वास ठेव आणि तुझ्या मार्गाने जा, आणि करु नको...आणि जर तू विश्वास ठेवलास तर तू ह्यापुढे धुम्रपान करणार नाहीस. जा, आणि प्रभू तुम्हास आशीर्वाद देवो.

तुम्ही काय घडत आहे ते पाहा. तो खरा आहे की नाही?

145 मी तुला ओळखीत नाही, आपण एकमेकांस अनोळखी आहोत. मी तुला माझ्या आयुष्यात कधीच पाहीले नाही, पण देव तुला ओळखतो. जर देव मला तुझ्याविषयी काही सांगेल. तर तू विश्वास ठेवशील काय?

146 सर्व प्रेक्षक विश्वास करतात का? तेथे बाहेर कोणी आहे का जो ह्या स्त्रीला ओळखतो काय? ठीक आहे, तुला ठाऊक आहे हे खरे आहे की नाही. हे ते सोडवू शकेल. हेच सत्य सांगतील.

147 आता तुम्ही पाहू शकता मागील थोड्याच मिनिटात काय घडले आहे. मी थरथर कापत आहे. पाहा. सर्वकाही माझ्यापुढे दिसेनासे होत आहे. पाहा, ते परिक्षण करीत आहे.

पाहा, तो पवित्र आत्मा आहे. तो मी नाही. ते वचन आजच्या दिवसासाठी अभिवचनाच्या स्वरुपात दिले आहे. असे प्रेषितांच्या दिवसात घडले नव्हते. ते कधीच नव्हते. परंतु असे कोठे सांगितले होते, "मनुष्याच्या पुत्राच्या येण्याअगोदर, जसे लोटाच्या दिवसात होते, तसे मनुष्याच्या पुत्राच्या येण्याच्या वेळेस असेल." अविश्वासी ह्यावर विश्वास ठेवीत नाही. त्यांनी विश्वास ठेवावा अशी अपेक्षा नाही. परंतु विश्वासी त्यावर विश्वास ठेवतात!

148 आता, जर पवित्र आत्मा प्रकट करील तर किती जण तुमच्या संपूर्ण हृदयाने विश्वास ठेवतील, त्यांनी तुमचे हात वर करावे?

149 तुमचे काही नुकसान झाले आहे. तुमच्या गाडीचा अपघात झाला आहे. तुमच्या मानेच्या काही शीरा ताणल्या गेल्या आहे. तुझे मुत्रपिंड ही खेचल्यामुळे हलले आहे. ते बरोबर आहे का, आहे की नाही? [ती बाई म्हणते, "होय, महाशय."—संपा.] तू विश्वास करतेस काय? ["होय महाशय."] तू पूर्णतः बरा होशील. प्रभूची स्तुती होवो.

150 तू विश्वास ठेवतेस की देव मूत्रपिंडाची समस्या दूर करतो? तर पुढे जा आणि तुझे आरोग्य स्विकार.

151 ये, बाई ह्या मार्गाने बघ. तू विश्वास करतेस काय देव हृदयाचा आजार बरा करतो? ठीक आहे. तुझ्या मार्गाने जा आणि विश्वास कर, आणि तुझे हृदय बरे होईल.

152 येथे ये. तू विश्वास करतोस देव तुझी पाठ बरी करु शकतो, तुला बरे करु शकतो? जा आणि मग त्यावर विश्वास ठेव.

केवळ देवावर विश्वास ठेव. तुला तेवढंच करणं आहे.

153 ये, बाई. तू विश्वास करतेस की देव पोटाच्या समस्या बऱ्या करतो? जा, तुझे जेवण खा, तुझ्या संपूर्ण हृदयाने विश्वास ठेव.

154 ये. तू विश्वास ठेवतेस की देव संधिवात बरा करतो? तर मग जा, विश्वास ठेव आणि...देव तुला बरे करील.

155 ठीक आहे, ये. तू तुझ्या पूर्ण हृदयाने विश्वास करतेस काय? तू विश्वास ठेवतेस काय? संधिवात पुन्हा. तू विश्वास करते की देव तुला बरे करु शकतो? जा, विश्वास ठेव, म्हण, "धन्यवाद, प्रभू."

तेथे किती जण विश्वास करतात? तुम्ही विश्वास करता का?

156 ती महिला येथे लाल पोशाख घालून बसलेली आहे, तिचे हात वर करीत आहे, उच्च रक्तदाबाने त्रस्त आहे. तू विश्वास ठेवते की देव तुला आरोग्य देईल? तू ठेवतेस का? ठीक आहे. तुझे हात तेथे तुझ्या बाजूच्या स्त्रीवर ठेव. आणि तीला सांग तिचा आवाज बरा होईल. आमेन.

तेथे ते आहे. आमेन. तू विश्वास ठेवतेस? विश्वास ठेव.

157 येथे एक मनुष्य बसला आहे, रक्तस्त्रावाचा त्रास आहे. तू विश्वास ठेवतोस, महाशय, येथे बसलेला. होय तुला रक्तस्त्रावाचा त्रास आहे. तू विश्वास ठेवतोस की तो बरा होईल?

158 तुझ्या बाजूच्या महिलेला रक्तस्त्रावाचा त्रास आहे, आणि तिला पाठीचा त्रास आहे. तू विश्वास ठेवतेस की देव तुला आरोग्य देणार आहे? तू विश्वास ठेवतेस का? तुझा हात वर कर आणि ते स्विकार, विश्वास कर.

159 ही तुझ्या बाजूची महिला तिच्या पायांना आणि तिच्या नितंबाला त्रास आहे. तू विश्वास करते की हे बरोबर आहे, बाई? तू विश्वास ठेवतेस की तू बरी होशील? ठीक आहे, तुझे हात वर कर, सांग, "मी ते स्विकारते."

160 ठीक आहे, तिच्या बाजूच्या महिलेला संसर्ग दोष आहे. तू विश्वास ठेवतेस की देव संसर्गदोष बरा करील. तरुण महिला जिने चष्मा घातला आहे. तुझा हात वर कर, सांग, "मी ते स्विकारते." ठीक आहे, त्यावर विश्वास कर.

161 तिच्या बाजूच्या महिलेस मूत्रपिंडाचा त्रास आहे. तू विश्वास ठेवते की देव मूत्रपिंडाचा आजार बरा करील? ठीक, तुझा हात वर कर, ते स्विकार

162 तिच्या बाजूच्या लहान मूलीच्या गळ्यात गाठ आहे. तू विश्वास करतेस की देव तेथे असलेली गाठ बरी करील? तुझा हात वर कर, स्विकार कर.

163 किती जण पूर्ण हृदयाने विश्वास करतात? तर मग तुमच्या पायांवर उभे राहा आणि ते स्विकारा. अब्राहाम, इसहाक आणि याकोबाच्या देवाच्या उपस्थितीत उभे राहा.

164 प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावाने पवित्र आत्मा ह्या इमारतीत आता असणाऱ्या सर्वांवर येवो आणि त्याच्या दैवी उपस्थितीत प्रत्येक व्यक्तीला आरोग्य देवो!

***देव स्वयं त्याच्या वचनाचा अनुवादक आहे*** MAR64-0205

(God Is His Own Interpreter)

हा संदेश, भाऊ विल्यम मेरीयन ब्रॅन्हम ह्यांच्या द्वारे, मूळ स्वरूपात इंग्रजीमध्ये, 5 फेब्रुवारी 1964 साली, बेकर्सफिर कॅलिफोर्निया, संयुक्त राज्य अमेरिकेत कर्नकाऊटी फेंयरग्राऊंड येथे प्रचार केला होता जो चुंबकीय टेप रेकोर्डिंग मधून घेतला गेला आहे आणि इंग्रजीमध्ये विस्तृत स्वरुपात छापला गेला आहे. हे मराठी भाषांतर, व्हॉइस ऑफ गॉड रेकॉर्डिंग्स ह्यांनी छापले आहे आणि त्याचा वाटप करण्यात आला आहे.

MARATHI

©2020 VGR, ALL RIGHTS RESERVED

VOICE OF GOD RECORDINGS, INDIA OFFICE
19 (NEW NO: 28) SHENOY ROAD, NUNGAMBAKKAM
CHENNAI 600 034, INDIA
044 28274560 • 044 28251791
india@vgroffice.org

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org

## छपाईच्या हक्काची सूचना

संपूर्ण हक्क राखीव आहेत हे पुस्तक घरातील प्रिंन्टरवर स्वतःच्या उपयोगा करिता, किंवा दूस-यांना मोफत देण्या करिता, येशू ख्रिस्ताची सुवार्ता प्रसार करण्या करिता एक साधन म्हणून छापू शकता येईल. हे पुस्तक विकू शकता येणार नाही. किंवा फार मोठया प्रमाणावर प्रती काढण्यास मनाई आहे. किंवा वेबसाईडवर प्रसार करण्यास मनाई आहे. कोणत्याही प्रकारच्या पुर्नःप्राप्ति प्रणाली मधून नक्कल करण्यास मनाई आहे. दूस-या भाषेत भाषांतर करण्यास किंवा रक्कम गोळा करण्यास मनाई आहे. या सर्व गोष्टीं करण्याकरिता Voice Of God Recordings यांची लिखित परवानगी घेणे आवश्यक आहे.

अधिक माहिती करिता किंवा इतर उपलब्ध गोष्टीं करिता कृपया संपर्क साधा.

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org